# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

जा.क्र.कोविमं./उमा.गोप/५७५
दिनांक- ०६/०७/२०२१

निकाल प्राधान्य/तातडीचे

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेच्या मूल्यमापन कार्यपध्दती बाबत..

संदर्भ :- शासन निर्णय क्र.परीक्षा ०६२१/प्र.क्र./५६/एसडी-२ दिनांक ०२/०७/२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित शासन निर्णयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी ) परीक्षेसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशील,सूचना व वेळापत्रक मंडळा मार्फत निश्चित करण्यात आलेले असून त्याची कार्यपद्धती तयार करण्यात आलेली आहे. या संदर्भातील क्र.रामं./परीक्षा-२/३८९० दिनांक ०५/०७/२०२१ चे परिपत्रक व मूल्यमापनाचे विषय निहाय गुण तक्ते असे ०१ ते ७९ पृष्ठे सोबत जोडली आहेत.त्यानुसार उचीत कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

टिप
मुख्याध्यापक/प्राचार्य व शिक्षक यांच्या साठी मूल्यामापन कार्यपध्दती बाबत मंडळाच्या युटूब चॅनल वर प्रशिक्षण बुधवार दिनांक ०७/०७/२०२१ रोजी सकाळी ११ ते १.०० या वेळेत आयोजित करण्यात आले आहे याची नोंद घ्यावी.

Sandip/other

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

परिपत्रक क्र.रा.मं./परीक्षा-२/३८००  दि. ०५/०७/२०२१

विषय - शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत..

संदर्भ -१. शासन निर्णय क्रमांक - परीक्षा ०६२१/प्र.क्र.४६/एसडी-२, दि.११ जून २०२१

२. शासन निर्णय क्रमांक - परीक्षा ०६२१/प्र.क्र.५६/एसडी-२, दि.०२ जुलै २०२१

कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे. सदर परीक्षा रद्द केल्यामुळे, परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक/प्रमाणपत्र देण्याबाबत स्वतंत्रपणे निर्देश निर्गमित करण्यात येतील, असेही उपरोक्त शासन निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीचा तपशील जाहीर केलेला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेल्या इयत्ता १२ वी च्या परीक्षेसाठी मंडळाकडे नोंदणी केलेल्या नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी, तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परिक्षार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट विद्यार्थी यांचे मूल्यमापनाबाबत उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील तरतूदी लक्षात घेऊन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णयातील दिलेल्या निर्देशानुसार मंडळामार्फत मूल्यमापन प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

## १. कार्यवाहीचे वेळापत्रक-

सदर शासन निर्णय व मंडळाने या परिपत्रकाद्वारे तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांद्वारे दिलेली कार्यपध्दती व सूचना याबाबत पुढील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | मुख्याध्यापक/प्राचार्य व शिक्षक यांचेसाठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत मंडळाच्या यु-ट्युब चॅनेलवरुन प्रशिक्षण | दि.०७/०७/२०२१ (स.११.०० ते दु.०१.००) |
| २. | अपवादात्मक परिस्थितीत कोणत्याही प्रकारचे मूल्यमापन न झालेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे | दि.०७/०७/२०२१ ते दि.१४/०७/२०२१ |
| ३. | विषय शिक्षकांनी विषयनिहाय गुणतक्ते वर्ग शिक्षकांकडे सादर करणे. | |
| ४. | वर्ग शिक्षकांनी संकलित निकाल अंतिम करुन तो उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या निकाल समितीकडे सादर करणे. | |
| ५. | वर्ग शिक्षकांनी तयार केलेल्या निकालाचे निकाल समितीने परीक्षण व नियमन करून प्रमाणित करणे. | दि. ०८/०७/२०२१ ते दि. १७/०७/२०२१ |
| ६. | मुख्याध्यापक/प्राचार्यांनी निकाल समितीने प्रमाणित केलेल्या निकालानुसार विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण मंडळाच्या संगणकीय प्रणालीमध्ये भरणे. | दि. १४/०७/२०२१ ते दि. २१/०७/२०२१ |
| ७. | मुख्याध्यापक/प्राचार्यांनी निकाल समितीने प्रमाणित केलेले विद्यार्थ्यांचे निकाल व अनुषंगिक स्वाक्षरी प्रपत्रे सिलबंद पाकीटात विभागीय मंडळात जमा करणे. (विभागीय मंडळाच्या नियोजनानुसार) | दि. २१/०७/२०२१ ते दि. २३/०७/२०२१ |
| ८. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा निकालाबाबत विभागीय मंडळ व राज्यमंडळ स्तरावरील प्रक्रिया | दि.२३/०७/२०२१ पासून |

## २. निकाल समिती गठीत करणे-

- उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांनी शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे तात्काळ कमाल ०७ सदस्यांची निकाल समिती गठीत करावी.
- निकाल समितीने बैठक घेऊन मंडळाच्या कार्यवाहीच्या वेळापत्रकाप्रमाणे समितीच्या कामकाजाची रुपरेषा ठरवावी.
- समितीने उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील इ.१२ वी ला अध्यापन केलेल्या सर्व विषय शिक्षकांची व वर्ग शिक्षकांची बैठक घेऊन शासन निर्णयातील तरतूदीनुसार मूल्यमापनाची कार्यपध्दती स्पष्ट करावी. तसेच सर्व शंकांचे निरसन करावे व वेळोवेळी मार्गदर्शन करावे.
- वर्ग शिक्षकांनी तयार केलेल्या विद्यार्थीनिहाय संकलित निकालाचे परीक्षण व नियमन समितीमार्फत करण्यात यावे.
- समितीने शासन निर्णयातील निकषानुसार निकालाचे परीक्षण व नियमन अभिलेख/कागदपत्रांच्या आधारे करुन विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण अचूक असल्याची खात्री करुन निकाल स्वाक्षरीसह दोन प्रतीत प्रमाणित करावा.
- समितीने प्रमाणित केलेला निकाल संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक /प्राचार्यांकडे सुपूर्त करावा.

## ३. मुख्याध्यापक/प्राचार्यांनी करावयाची कार्यवाही-

अ. इयत्ता १२ वीचे विषय शिक्षक, वर्ग शिक्षक व पर्यवेक्षक यंत्रणा यांची बैठक घेऊन शासन निर्णयाचे प्रकट वाचन करावे. त्यातील निकष व कार्यपध्द्ती समजून घेऊन सर्वंकष चर्चा करावी व सर्व शंकांचे निरसन करावे.

ब. मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक टप्प्याचे कामकाज वेळेत पूर्ण करावे.

क. मंडळाकडे परीक्षेसाठी आवेदनपत्रे भरुन नोंदणी केलेल्या व मंडळाचे बैठक क्रमांक प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचेच मूल्यमापन करण्यात यावे.

ड. नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच पुनर्परीक्षार्थी, खाजगी विद्यार्थी, तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी यांच्याबाबतीत संबंधित विषय शिक्षक व वर्ग शिक्षक यांच्याकडून मूल्यमापनाबाबत कार्यवाही करुन घेण्यात यावी.

इ. समितीने प्रमाणित केलेला निकाल मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार संगणक प्रणालीमध्ये नोंदवावा.

उ. नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी, तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परिक्षार्थी यांचेबाबतीत लागू असल्याप्रमाणे समितीने प्रमाणित केलेल्या इ.१२ वीच्या संकलित निकालाची एक मूळ प्रत व फक्त अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या इ.१० वीच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत व इ.११ वीच्या संकलित निकालाची साक्षांकित प्रत (इ.११ वी अन्य मंडळातून/अन्य कनिष्ठ महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ.११ वीच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत) सिलबंद पाकीटात मुख्याध्यापक/प्राचार्यांच्या अभिरक्षेत ठेवून त्याची दुसरी प्रत संबंधित विभागीय मंडळाकडे निर्धारित कालावधीत जमा करावी. उपरोक्त साक्षांकित प्रतीवर संबंधित विद्यार्थ्यांचे सन २०२१ च्या इ.१२ वीच्या परीक्षेचे मंडळाचे बैठक क्रमांक नमूद करावेत.

## ४. निकाल तयार करण्यासाठी कार्यपध्दती-

### अ. नियमित विद्यार्थ्यांसाठी-

- संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ साठी प्रविष्ठ नियमित विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी सदर शासन निर्णयातील तक्ता क्र.२ प्रमाणे इयत्तानिहाय भारांश व तक्ता क्र.३ प्रमाणे इयत्ता व विषयनिहाय गुणविभागणी विचारात घ्यावी.

तक्ता-२

| अ.क्र. | इयत्ता | मूल्यमापनाचा तपशिल | भारांश |
|---|---|---|---|
| १. | इ.१०वी | इयत्ता १० वी मधील मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण | ३०% |
| २. | इ.११वी | इयत्ता ११ वी च्या वार्षिक मूल्यमापनातील विषयनिहाय गुण | ३०% |
| ३. | इ.१२वी | वर्षभरातील अंतर्गत मूल्यमापनातील प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा, सराव चाचण्या, तत्सम मूल्यमापन यातील विषयनिहाय गुण | ४०% |

तक्ता - ३

| इ.१२वी लेखी परीक्षा एकूण निर्धारित गुण | लेखी परीक्षा इयत्ता निहाय गुण विभागणी | | | तोंडी/ प्रात्यक्षिक/ अंतर्गत मूल्यमापन गुण इ.१२वी | इयत्तानिहाय गुण | | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इ.१०वी (३०%) | इ.११वी (३०%) | इ.१२वी (४०%) | | इ.१०वी | इ.११वी | इ.१२वी | |
| १०० | ३० | ३० | ४० | ० | ३० | ३० | ४० | १०० |
| ८० | २४ | २४ | ३२ | २० | २४ | २४ | ५२ | १०० |
| ७० | २१ | २१ | २८ | ३० | २१ | २१ | ५८ | १०० |
| ५० | १५ | १५ | २० | ५० | १५ | १५ | ७० | १०० |
| ८० | २४ | २४ | ३२ | ७० | २४ | २४ | १०२ | १५० |
| ० | ० | ० | ० | १०० | ० | ० | १०० | १०० |
| ८० | २४ | २४ | ३२ | १२० | २४ | २४ | १५२ | २०० |
| १०० | ३० | ३० | ४० | १०० | ३० | ३० | १४० | २०० |
| १६० | ४८ | ४८ | ६४ | ४० | ४८ | ४८ | १०४ | २०० |
| ८० | २४ | २४ | ३२ | १२० | २४ | २४ | १५२ | २०० |
| ६० | १८ | १८ | २४ | ४० | १८ | १८ | ६४ | १०० |

- सदर विद्यार्थ्यांच्या बाबतीत मूल्यमापन करताना इ.१० वीच्या सर्वोत्तम तीन विषयांचे सरासरी गुण, इ.११ वीच्या वार्षिक मूल्यमापनातील विषयनिहाय गुण व इ.१२ वीचे वर्षभरातील अंतर्गत मूल्यमापनातील प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा, सराव चाचण्या, तत्सम मूल्यमापन यातील विषयनिहाय प्राप्त गुण तसेच इ.१२ वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत व तत्सम मूल्यमापन इत्यादींच्या आधारे विद्यार्थ्यांना विषयनिहाय प्राप्त झालेले गुण विचारात घेण्यात यावेत. सदर गुणदान करताना शासन निर्णयातील सर्व तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

  इयत्ता १० वी, इ.११ वी व इ.१२ वी मधील प्राप्त गुणांचे इ.१२ वीसाठी भारांशानुसार निर्धारित गुणांमध्ये रूपांतर करतांना अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत.(उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

## अ) (१) विद्यार्थ्यास इ.१० वीमध्ये मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण निश्चित करण्याची कार्यपध्दती

- इयत्ता १० वी ला प्रविष्ठ होवून एकाच परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याच्या अंतिम निकालातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीला एकापेक्षा अधिक परीक्षेत प्रविष्ठ होवून टप्प्या टप्प्याने सूट मिळवून उत्तीर्ण झालेल्या व इ.१२ वीला नियमित विद्यार्थी म्हणून प्रविष्ट असलेल्या विद्यार्थ्याच्या बाबतीत, विद्यार्थ्याने दिलेल्या इयत्ता १० वीच्या सर्व परीक्षांचा निकाल विचारात घेवून त्यातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीमध्ये श्रेणी सुधार योजनेअंतर्गत श्रेणी वाढ स्विकारलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत श्रेणी वाढ झालेली संपादणूक विचारात घेवून कार्यवाही करावी.

  राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळातून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत ५,६,७ किंवा त्यापेक्षा अधिक विषय असल्यास सर्वोत्तम गुणांचे ३ विषय विचारात घेवून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.
- सदर गुणांचे निश्चितीकरण करण्याची प्रक्रीया सुलभ व्हावी यासाठी मार्च २०१९ मध्ये राज्य मंडळाची माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा नियमित व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या संपादणूकीचा तपशिल मंडळामार्फत mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जाईल. यासाठी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इयत्ता १२ वीला सन २०२१ च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे इ.१०वी च्या मार्च २०१९ मधील परीक्षेचे बैठक क्रमांक Excel sheet मध्ये एकाच कॉलममधील एका सेलमध्ये एकच बैठक क्रमांक याप्रमाणे भरावेत.
- उदा.-

| |
|---|
| C006613 |
| C015812 |
| C017852 |
| C100663 |
| C196619 |

- मंडळामार्फत देण्यात आलेला Login ID व Password वापरून Login करावे. तद्नंतर Browse च्या बटनवर click करून सदर Excel sheet अपलोड करावी. तद्नंतर उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सदर विद्यार्थ्यांची माहिती परिशिष्ट- जे आर १.०१ मधील नमुन्यात Login मध्ये उपलब्ध होईल. त्याची प्रिंट काढून पुढील प्रक्रीयेसाठी वापर करावा.
- सदर सरासरी गुण इ.१० वीच्या ३० टक्के भारांशानुसार गुण निश्चितीसाठी प्रत्येक विषयाकरीता वापरता येईल.

  सदर सुविधा दि.०७/०७/२०२१ पासून मंडळाच्या संगणक प्रणालीव्दारे विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण भरण्याची प्रक्रीया सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवसापर्यंतच (दि.१३/०७/२०२१) उपलब्ध असेल. त्यामुळे सर्व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या अशा विद्यार्थ्यांबाबत सरासरी गुण उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सदर कालावधीत पूर्ण करून त्याची प्रिंट काढून घ्यावी.
- राज्य मंडळाच्या मार्च २०१९ पूर्वीच्या परीक्षेत इ.१० वी उत्तीर्ण झालेल्या अथवा अन्य मंडळातून इ.१० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत सदर गुणांचे निश्चितीकरण करण्याची प्रक्रीया सुलभ व्हावी यासाठी मंडळामार्फत परिशिष्ट जे आर १.०१ व जे आर १.०२ मधील नमुन्यातील Excel sheet स्वरूपातील तक्ता उपलब्ध करून दिला जाईल. इयत्ता १२ वीला सन २०२१ च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची इ.१० वीच्या सर्व विषयांची संपादणूक त्यामध्ये भरल्यानंतर सदर विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांची बेरीज व पूर्णांकातील सरासरी (१०० पैकी) उपलब्ध होईल. सदर सरासरी इ.१० वीच्या ३० टक्के भारांशानुसार गुण निश्चितीसाठी प्रत्येक विषयाकरीता वापरता येईल.

### अ) (२) विद्यार्थ्यास इ.११ वीच्या अंतिम निकालामध्ये प्राप्त गुण

- विद्यार्थ्यास इ.११ वीच्या अंतिम निकालामध्ये प्राप्त झालेले विषयनिहाय गुण इ.१२ वीसाठी त्या त्या विषयाकरीता विचारात घ्यावेत. अन्य मंडळातून इ.११ वी उत्तीर्ण होवून इ.१२ वीसाठी राज्य मंडळाशी संलग्न उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत संबंधित मंडळाच्या इ.११ वीच्या अंतिम निकालातील विषयनिहाय गुण विचारात घ्यावेत.
- राज्य मंडळ/अन्य मंडळाच्या विद्यार्थ्याबाबत इ.१२ वीमध्ये प्रविष्ठ झालेल्या विषयांपैकी एक किंवा अधिक विषय इ.११ वीमध्ये घेतले नसल्यास अशा विषयांसाठी इ.११ वी मध्ये घेतलेल्या अन्य विषयांची सरासरी विचारात घेवून १०० पैकी गुण (पूर्णांकांत) निश्चित करावेत. व ते इ.११ वीसाठी न घेतलेल्या विषयांस देवून पुढील कार्यवाही करावी. इ.११ वीतून इ.१२ वीमध्ये प्रवेश घेताना शाखा बदल केलेल्या प्रकरणांत देखील याप्रमाणे कार्यवाही करावी.
- इ.११ वीमधील एक व अधिक विषय १०० पेक्षा अधिक गुणांचे असल्यास त्या विषयांचे प्रथम १०० पैकी गुणांत रूपांतर करून कार्यवाही करावी.

## अ) (३) इ.१२ वीच्या वर्षभरातील अंतर्गत मूल्यमापनातील प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा, सराव चाचण्या, तत्सम मूल्यमापन यातील विषयनिहाय गुण

- उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने विषयनिहाय मंजूर आराखडयानुसार वर्षभर ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा, सराव चाचण्या वा तत्सम मूल्यमापन केलेले आहे.
- सदर सर्व परीक्षांमध्ये मिळून विद्यार्थ्यास विषयनिहाय प्राप्त झालेले गुण किती व ते किती पैकी आहेत याचा विचार करुन त्या विषयाच्या इयत्ता १२ वीसाठी भारांशानुसार निश्चित केलेल्या गुणांमध्ये रुपांतर करुन ते पूर्णांकात विचारात घ्यावेत.
- उदा.

| अ. क्र. | विषय | प्रथम सत्र परीक्षा | | सराव परीक्षा | | सराव चाचण्या व तत्सम मूल्यमापन (गृहकार्य, प्रकल्प इ.) | | वर्षभरातील सर्व अंतर्गत मूल्यमापनात मिळून | | विषयनिहाय इ.१२वीच्या भारांशानुसार ६४/४०/३२/२८/२४/२० गुणांसाठी रुपांतर (पूर्णांकात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | किती पैकी | प्राप्त गुण | किती पैकी | प्राप्त गुण | किती पैकी | प्राप्त गुण | किती पैकी | |
| १ | इंग्रजी | ३५ | ५० | ७२ | १०० | २९ | ४० | १३६ | १९० | १३६ X ३२÷१९० = २२.९१ i.e. २३ |
| २ | भौतिकशास्त्र | ४१ | ५० | ८० | १०० | ४९ | ६० | १७० | २१० | १७०X२८ ÷ २१० = २२.६७ i.e. २३ |
| ३ | ग्रंथालय व माहिती शास्त्र | २९ | ५० | ६३ | १०० | १७ | २५ | १०९ | १७५ | १०९ X२० ÷१७५ = १२.४६ i.e. १३ |
| ४ | भारतीय संगीताचा इतिहास व विकास | ४४ | ५० | ९२ | १०० | ७३ | ८० | २०९ | २३० | २०९ X४०÷२३०= ३६.३५ i.e. ३७ |
| ५ | सर्वसाधारण पायाभूत अभ्यासक्रम (GFC) | ३४ | ५० | ७४ | १०० | ३६ | ५० | १४४ | २०० | १४४ X२४÷२००= १७.२८ i.e. १८ |
| ६ | संगणक शास्त्र(D9) भाग-१ | ४५ | ५० | ९२ | १०० | ४७ | ५० | १८४ | २०० | १८४ X२०÷२००= १८.४० i.e. १९ |
| | संगणक शास्त्र(D9) भाग-२ | ४६ | ५० | ९४ | १०० | ४५ | ५० | १८५ | २०० | १८५ X२०÷२००= १८.५० i.e. १९ |
| | एकूण | ९१ | १०० | १८६ | २०० | ९२ | १०० | ३६९ | ४०० | १९+१९ = ३८ |
| ७ | रेडिओग्राफी(PA) | ३४ | ५० | ७२ | १०० | ५८ | ८० | १६४ | २३० | १६४ X३२÷२३०= २२.८२ i.e. २३ |

टिप-

१. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये उपरोक्त सर्व प्रकारचे मूल्यमापन आयोजित न करता काही परीक्षांचेच आयोजन करण्यात आलेले असल्यास, प्रत्यक्ष आयोजित केलेल्या परीक्षेतील संपादणूक (किती पैकी किती गुण) विचारात घेऊन उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.

२. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या परीक्षांपैकी काही परीक्षांना विद्यार्थी अनुपस्थित असल्यास अशा विद्यार्थ्यांनी दिलेल्या परीक्षांमधील संपादणूक (किती पैकी किती गुण) विचारात घेऊन, उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.

## अ) (४) मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१२ वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत/तत्सम मूल्यमापन यामध्ये प्राप्त झालेले गुण

- शासन निर्णयानुसार मंडळाच्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून प्रचलित पध्दतीने/अन्य पर्यायी पध्दतीचा वापर करून ऑनलाईन/अन्य शक्य पर्यायी पध्दतीने केलेल्या मूल्यमापनानुसार विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले गुण विचारात घ्यावेत.

## अ) (५) श्रेणी विषयांचे मूल्यमापन

- श्रेणी विषयांसाठी विहित पध्दतीने व यावर्षी मंडळाने दिलेल्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून विद्यार्थ्यांना गुणदान करून प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करावे.

## अ) (६) विषयनिहाय Excel sheet स्वरूपातील परिशिष्ट

(I) अ)(१) प्रमाणे निश्चित केलेले इ.१० वीच्या सर्वोत्तम तीन विषयांचे १०० पैकी सरासरी गुण,

(II) अ)(२) प्रमाणे विचारात घ्यावयाचे इ.११ वीच्या वार्षिक मूल्यमापनातील विषयनिहाय १०० पैकी प्राप्त गुण

(III) अ)(३) प्रमाणे विचारात घेतलेले इ.१२ वीचे वर्षभरातील अंतर्गत लेखी मूल्यमापनातील विषयनिहाय प्राप्त गुण (किती पैकी किती गुण)

(IV) अ)(४) प्रमाणे इ.१२ वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत व तत्सम मूल्यमापन यामध्ये प्रत्यक्ष प्राप्त गुण

इत्यादी बाबींच्या नोंदी करण्यासाठी मंडळामार्फत विषयनिहाय परिशिष्टे (गुण विभागणी विचारात घेवून) Excel sheet स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये उपरोक्त चार प्रकारातील गुणांची नोंद केल्यानंतर उर्वरित रकान्यातील गुण आपोआप रूपांतरीत होवून भरले जातील.

यासाठी परिशिष्ट- जे १.०१ ते जे १.१२ चा वापर करण्यात यावा. तसेच श्रेणी विषयांची श्रेणी नमूद करण्यासाठी परिशिष्ट- जे १.१३ वापरावे.

- पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (NSQF)अंतर्गत विषयांच्या लेखी परीक्षेसाठी ८० पैकी प्राप्त गुणांच्या नोंदी संबंधित परिशिष्टांमध्ये करण्यात याव्यात. तसेच अंतिम प्रात्यक्षिकासाठी ७० (२०+५०) पैकी प्राप्त गुणांच्या नोंदी घेण्यात याव्यात. मंडळामार्फत उपरोक्त प्रमाणे १५० पैकी प्राप्त गुणांचे रूपांतर १०० पैकी प्राप्त गुणात करण्यात येईल.
- व्यवसाय अभ्यासक्रम (MCVC) अंतर्गत येणाऱ्या विषयांसाठी प्रचलित पध्दतीने २०० गुणांपैकी गुणदान करण्यात यावे. मंडळ स्तरावर सदर गुणांचे १०० पैकी गुणांत रूपांतर करून निकाल निश्चित करण्यात येईल.
- विषय शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या विषयनिहाय गुणांचे/श्रेणींचे विद्यार्थीनिहाय संकलन शाखांप्रमाणे स्वतंत्रपणे वर्ग शिक्षकांमार्फत दोन प्रतीत करण्यात यावे. त्यासाठी विहित नमुन्यातील **परिशिष्ट - जे आर १.०३ ते जे आर १.०८** (विषय योजनेनुसार लागू होणारे परिशिष्ट) वापरावे. सदर संकलित निकाल वर्गशिक्षकांनी स्वाक्षरीत करुन मुख्याध्यापक/प्राचार्यांकडे जमा करावा.

- उपरोक्त सर्व बाबी व सूचना विचारात घेवून विद्यार्थ्यांचे विषयनिहाय निश्चित केलेले गुण/श्रेणी मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संगणक प्रणालीमध्ये इंग्रजी अंक/अक्षरांमध्ये भरण्यात यावेत.

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा संकलित निकाल तयार करताना परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे विषयनिहाय प्राप्त गुण नोंदवावे. सवलतीचे गुण, कला आणि क्रीडा सवलतीचे गुण नोंदविण्यात येऊ नयेत, याबाबतची कार्यवाही मंडळस्तरावर करण्यात येईल.

## ब. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी

### ब) (१) काही विषयांसाठी प्रविष्ट पुनर्परीक्षार्थी-(नियमित व खाजगी पुनर्परीक्षार्थी)

- संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ साठी प्रविष्ठ पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी सदर शासन निर्णयातील तक्ता क्र.४ प्रमाणे इयत्तानिहाय भारांश व तक्ता क्र.५ प्रमाणे इयत्ता व विषयनिहाय गुणविभागणी विचारात घ्यावी.

तक्ता-४

| अ.क्र. | इयत्ता | मूल्यमापनाचा तपशिल | भारांश |
|---|---|---|---|
| १. | इ.१०वी | इयत्ता १० वी मधील मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण | ५०% |
| २. | इ.१२वी | राज्य मंडळाच्या यापूर्वीच्या इयत्ता १२ वी च्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांची सरासरी | ५०% |

तक्ता - ५

| इ.१२वी लेखी परीक्षा एकूण निर्धारित गुण | लेखी परीक्षा इयत्ता निहाय गुण विभागणी | | तोंडी/ प्रात्यक्षिक/ अंतर्गत मूल्यमापन गुण इ.१२वी | इयत्तानिहाय गुण | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | इ.१०वी (५०%) | इ.१२वी (५०%) | | इ.१०वी | इ.१२वी | |
| १०० | ५० | ५० | ० | ५० | ५० | १०० |
| ८० | ४० | ४० | २० | ४० | ६० | १०० |
| ७० | ३५ | ३५ | ३० | ३५ | ६५ | १०० |
| ५० | २५ | २५ | ५० | २५ | ७५ | १०० |
| ८० | ४० | ४० | ७० | ४० | ११० | १५० |
| ० | ० | ० | १०० | ० | १०० | १०० |
| ८० | ४० | ४० | १२० | ४० | १६० | २०० |
| १०० | ५० | ५० | १०० | ५० | १५० | २०० |
| १६० | ८० | ८० | ४० | ८० | १२० | २०० |
| ८० | ४० | ४० | १२० | ४० | १६० | २०० |
| ६० | ३० | ३० | ४० | ३० | ७० | १०० |

- सदर विद्यार्थ्यांच्या बाबतीत मूल्यमापन करताना इ.१० वीच्या सर्वोत्तम तीन विषयांचे सरासरी गुण, राज्य मंडळाच्या यापूर्वीच्या इयत्ता १२ वी च्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांची सरासरी तसेच इ.१२ वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत व तत्सम मूल्यमापन इत्यादींच्या आधारे विद्यार्थ्यांना विषयनिहाय प्राप्त झालेले गुण विचारात घेण्यात यावेत. सदर गुणदान करताना शासन निर्णयातील सर्व तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

  इयत्ता १० वी व इ.१२ वी मधील प्राप्त गुणांचे इ.१२ वीसाठी भारांशानुसार निर्धारित गुणांमध्ये रूपांतर करतांना अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत.(उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

## ब) (१.१) विद्यार्थ्यास इ.१० वीमध्ये मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण निश्चित करण्याची कार्यपध्दती

- इयत्ता १० वी ला प्रविष्ठ होवून एकाच परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याच्या अंतिम निकालातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीला एकापेक्षा अधिक परीक्षेत प्रविष्ठ होवून टप्प्याटप्प्याने सूट मिळवून उत्तीर्ण झालेल्या व इ.१२ वीला पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट असलेल्या विद्यार्थ्याच्या बाबतीत, विद्यार्थ्याने दिलेल्या इयत्ता १० वीच्या सर्व परीक्षांचा निकाल विचारात घेवून त्यातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीमध्ये श्रेणी सुधार योजनेअंतर्गत श्रेणी वाढ स्विकारलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत श्रेणी वाढ झालेली संपादणूक विचारात घेवून कार्यवाही करावी.

  राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळातून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत ५,६,७ किंवा त्यापेक्षा अधिक विषय असल्यास सर्वोत्तम गुणांचे ३ विषय विचारात घेवून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.
- सदर गुणांचे निश्चितीकरण करण्याची प्रक्रीया सुलभ व्हावी यासाठी मंडळामार्फत परिशिष्ट जे आर १.०१ व जे आर १.०२ मधील नमुन्यातील Excel sheet तक्ता उपलब्ध करून दिला जाईल. इयत्ता १२ वीला सन २०२१ च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची इ.१० वीच्या सर्व विषयांची संपादणूक त्यामध्ये भरल्यानंतर सदर विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांची बेरीज व पूर्णांकातील सरासरी (१०० पैकी) उपलब्ध होईल. सदर सरासरी इ.१० वीच्या ५० टक्के भारांशानुसार गुण निश्चितीसाठी प्रत्येक विषयाकरीता वापरता येईल.

## ब) (१.२) राज्य मंडळाच्या यापूर्वी इ.१२ वीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांची सरासरी

- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी यापूर्वी इ.१२ वी परीक्षेसाठी प्रविष्ठ होवून उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या बाबतीत सदर परीक्षेचे वर्ष व बैठक क्रमांक भरण्यासाठी परिशिष्ट स्वरूपातील Excel sheet तक्ता मंडळामार्फत उपलब्ध करून दिला जाईल.

- विद्यार्थी एकापेक्षा अधिक वेळा मंडळाच्या परीक्षेस प्रविष्ठ झाला असल्यास उपरोक्त प्रमाणे माहिती प्रत्येक विषयासाठी स्वतंत्रपणे भरावी.
- सदर तक्त्यामध्ये इ.१२ वीच्या परीक्षांमध्ये यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेसाठी निर्धारित गुण व प्राप्त गुण नमूद करावेत. त्याआधारे उत्तीर्ण विषयांचे लेखी परीक्षेतील सरासरी गुण निश्चित करण्यात येतील.
- याशिवाय इ.१२ वीमध्ये यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांची सरासरी मंडळाच्या संगणक प्रणालीमार्फतही खात्री करून निश्चित करण्यात येईल.

**ब) (१.३) मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१२ वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत/तत्सम मूल्यमापन यामध्ये प्राप्त झालेले गुण**

- शासन निर्णयानुसार मंडळाच्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून प्रचलित पध्दतीने/अन्य पर्यायी पध्दतीचा वापर करून ऑनलाईन/अन्य शक्य पर्यायी पध्दतीने केलेल्या मूल्यमापनानुसार विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले गुण विचारात घ्यावेत.

**ब)(१.४) श्रेणी विषयांचे मूल्यमापन**

- एक किंवा अधिक श्रेणी विषयांत सूट न मिळालेल्या विद्यार्थ्याबाबत सदर विषयासाठी विहित पध्दतीने व यावर्षी मंडळाने दिलेल्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून विद्यार्थ्यांना गुणदान करून प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करावे.

**ब) (१.५) विषयनिहाय Excel sheet स्वरूपातील परिशिष्ट**

(I) ब)(१.१) प्रमाणे निश्चित केलेले इ.१० वीच्या सर्वोत्तम तीन विषयांचे १०० पैकी सरासरी गुण,

(II) ब)(१.२) प्रमाणे विचारात घेतलेले राज्य मंडळाच्या यापूर्वी इ.१२ वीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांचा तपशिल तसेच उत्तीर्ण झालेल्या विषयांच्या परीक्षेचा तपशिल

(III) ब)(१.३)प्रमाणे मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१२ वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत/तत्सम मूल्यमापन यामध्ये प्राप्त झालेले गुण

(IV) ब)(१.४) प्रमाणे श्रेणी विषयांचे मूल्यमापन

इत्यादी बाबींच्या नोंदी करण्यासाठी मंडळामार्फत विद्यार्थीनिहाय/विषयनिहाय परिशिष्टे (गुण विभागणी विचारात घेवून) Excel sheet स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामध्ये उपरोक्त चार प्रकारातील माहितीची/गुणांची नोंद करण्यात यावी. यासाठी परिशिष्ट– जे २.०१ ते जे २.०४ चा वापर करण्यात यावा.

- सदर विद्यार्थीनिहाय संकलित केलेली परिशिष्टे सर्व संबंधित विषय शिक्षकांनी स्वाक्षरीत करुन मुख्याध्यापक/प्राचार्याकडे जमा करावीत.

- **उपरोक्त सर्व बाबी व सूचना विचारात घेवून अंतिम केलेला विद्यार्थीनिहाय तपशिल, गुण, श्रेणी मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संगणक प्रणालीमध्ये इंग्रजी अंक/अक्षरांमध्ये भरण्यात यावा.**

ब) (२) श्रेणी विषयांव्यतिरिक्त एकाही विषयांत उत्तीर्ण न झालेले पुनर्परीक्षार्थी- (नियमित व खाजगी पुनर्परीक्षार्थी)

- संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ साठी श्रेणी विषयांव्यतिरिक्त एकाही विषयात उत्तीर्ण न झाल्याने पुनर्परीक्षार्थी म्हणून प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी सदर शासन निर्णयातील तक्ता क्र.६ प्रमाणे इयत्तानिहाय भारांश व तक्ता क्र.५ प्रमाणे (परिपत्रकातील पृ.क्र.०८ वर दिला आहे) इयत्ता व विषयनिहाय गुणविभागणी विचारात घ्यावी.

तक्ता-६

| अ.क्र. | इयत्ता | मूल्यमापनाचा तपशिल | भारांश |
|---|---|---|---|
| १. | इ.१०वी | इयत्ता १० वी मधील मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण | ५०% |
| २. | इ.१२वी | सराव चाचण्या, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम अंतर्गत मूल्यमापनातील विषयनिहाय गुण | ५०% |

- सदर विद्यार्थ्यांच्या बाबतीत मूल्यमापन करताना इ.१० वीच्या सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांचे सरासरी गुण व इ.१२ वीचे वर्षभरातील अंतर्गत **लेखी** मूल्यमापनातील सराव चाचण्या, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम अंतर्गत मूल्यमापनातील विषयनिहाय गुण तसेच इ.१२ वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत व तत्सम मूल्यमापन इत्यादींच्या आधारे विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुणदान करण्यात यावे. सदर गुणदान करताना शासन निर्णयातील सर्व तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

  इयत्ता १० वी, व इ.१२ वी मधील प्राप्त गुणांचे इ.१२ वीसाठी भारांशानुसार निर्धारित गुणांमध्ये रूपांतर करतांना अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत. (उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

**ब) (२.१) विद्यार्थ्यास इ.१० वीमध्ये मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण निश्चित करण्याची कार्यपध्दती**

- इयत्ता १० वी ला प्रविष्ठ होवून एकाच परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अंतिम निकालातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीला एकापेक्षा अधिक परीक्षेत प्रविष्ठ होवून टप्प्याटप्प्याने सूट मिळवून उत्तीर्ण झालेल्या व इ.१२ वीला पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत, विद्यार्थ्याने दिलेल्या इयत्ता १० वीच्या सर्व परीक्षांचा निकाल विचारात घेवून त्यातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीमध्ये श्रेणी सुधार योजनेअंतर्गत श्रेणी वाढ स्विकारलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत श्रेणी वाढ झालेली संपादणूक विचारात घेवून कार्यवाही करावी.

राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळातून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत ५,६,७ किंवा त्यापेक्षा अधिक विषय असल्यास सर्वोत्तम गुणांचे ३ विषय विचारात घेवून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.

- सदर गुणांचे निश्चितीकरण करण्याची प्रक्रीया सुलभ व्हावी यासाठी मंडळामार्फत परिशिष्ट जे आर १.०१ व जे आर १.०२ मधील नमुन्यातील Excel sheet तक्ता उपलब्ध करून दिला जाईल. इयत्ता १२ वीला सन २०२१ च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची इ.१० वीच्या सर्व विषयांची संपादणूक त्यामध्ये भरल्यानंतर सदर विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांची बेरीज व पूर्णांकातील सरासरी (१०० पैकी) उपलब्ध होईल. सदर सरासरी इ.१० वीच्या ५० टक्के भारांशानुसार गुण निश्चितीसाठी वापरता येईल.

## ब) (२.२) इ.१२ वी मधील सराव चाचण्या, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम अंतर्गत मूल्यमापनातील विषयनिहाय गुण

- उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने विषयनिहाय मंजूर आराखडयानुसार ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम मूल्यमापन यापैकी एक किंवा अधिक बाबींच्या आधारे मूल्यमापन करून विद्यार्थ्यास गुणदान करावे.
- सदर विषयनिहाय प्राप्त गुण किती व ते किती पैकी आहेत याचा विचार करुन त्या विषयाच्या इयत्ता १२ वीसाठी भारांशानुसार निश्चित केलेल्या गुणांमध्ये रुपांतर करुन ते पूर्णांकात विचारात घ्यावेत.

- उदा.

| अ. क्र. | विषय | सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम मूल्यमापन | | विषयनिहाय इ.१२वीच्या भारांशनुसार ८०/५०/४०/३५/३०/२५ गुणांसाठी रुपांतर (पूर्णांकात) |
|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | किती पैकी | |
| १ | इंग्रजी | २२ | ४० | २२ X ४०÷४० = २२ |
| २ | भौतिकशास्त्र | २५ | ६० | २५ X३५ ÷ ६० = १४.५८ i.e. १५ |
| ३ | ग्रंथालय व माहिती शास्त्र | १३ | २५ | १३ X२५ ÷२५ = १३ |
| ४ | भारतीय संगीताचा इतिहास व विकास | ३२ | ८० | ३२ X५०÷८०= २० |
| ५ | संगणक शास्त्र(D9) भाग-१ | ३२ | ५० | ३२ X२५÷५०= १६ |
| | संगणक शास्त्र(D9) भाग-२ | २८ | ५० | २८ X२५÷५०= १४ |
| | एकूण | ६० | १०० | १६+१४ = ३० |

## ब)(२.३) मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१२ वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत/तत्सम मूल्यमापन यामध्ये प्राप्त झालेले गुण

- शासन निर्णयानुसार मंडळाच्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून प्रचलित पध्दतीने/अन्य पर्यायी पध्दतीचा वापर करून ऑनलाईन/अन्य शक्य पर्यायी पध्दतीने केलेल्या मूल्यमापनानुसार विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले गुण विचारात घ्यावेत.

### ब)(२.४) श्रेणी विषयांचे मूल्यमापन

- एक किंवा अधिक श्रेणी विषयांत सूट न मिळालेल्या विद्यार्थ्यांबाबत सदर विषयासाठी विहित पध्दतीने व यावर्षी मंडळाने दिलेल्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून विद्यार्थ्यांना गुणदान करून प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करावे.

### ब) (२.५) विषयनिहाय Excel sheet स्वरूपातील परिशिष्ट

(I) ब)(२.१) प्रमाणे निश्चित केलेले इ.१० वीच्या सर्वोत्तम तीन विषयांचे १०० पैकी सरासरी गुण,

(II) ब)(२.२) प्रमाणे विचारात घेतलेले सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम मूल्यमापन यापैकी एक किंवा अधिक बाबींच्या मूल्यमापनाच्या आधारे प्राप्त गुण.

(III) ब)(२.३) प्रमाणे मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१२ वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत/तत्सम मूल्यमापन यामध्ये प्राप्त झालेले गुण.

(IV) ब)(२.४) प्रमाणे श्रेणी विषयांचे मूल्यमापन

इत्यादी बाबींच्या नोंदी करण्यासाठी मंडळामार्फत विद्यार्थीनिहाय/विषयनिहाय परिशिष्टे (गुण विभागणी विचारात घेवून) Excel sheet स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामध्ये उपरोक्त चार प्रकारातील माहितीची/गुणांची नोंद करण्यात यावी. यासाठी परिशिष्ट- जे २.०५ ते जे २.०८ चा वापर करण्यात यावा.

- सदर विद्यार्थीनिहाय संकलित केलेली परिशिष्टे सर्व संबंधित विषय शिक्षकांनी स्वाक्षरीत करुन मुख्याध्यापक/प्राचार्याकडे जमा करावीत.
- **उपरोक्त सर्व बाबी व सूचना विचारात घेवून अंतिम केलेला विद्यार्थीनिहाय तपशिल, गुण, श्रेणी मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संगणक प्रणालीमध्ये इंग्रजी अंक/अक्षरांमध्ये भरण्यात यावा.**

### क) (३.१) खाजगी विद्यार्थ्यांसाठी- (फॉर्म नं.१७)

- संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ साठी नाव नोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी सदर शासन निर्णयातील तक्ता क्र.७ प्रमाणे इयत्तानिहाय भारांश व तक्ता क्र.५ प्रमाणे (परिपत्रकातील पृ.क्र.०८ वर दिला आहे) इयत्ता व विषयनिहाय गुणविभागणी विचारात घ्यावी.

तक्ता-७

| अ.क्र. | इयत्ता | मूल्यमापनाचा तपशिल | भारांश |
|---|---|---|---|
| १. | इ.१०वी | इयत्ता १० वी मधील मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण | ५०% |
| २. | इ.१२वी | सराव चाचण्या, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम अंतर्गत मूल्यमापनातील विषयनिहाय गुण | ५०% |

- सदर विद्यार्थ्यांच्या बाबतीत मूल्यमापन करताना इ.१० वीच्या सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांचे सरासरी गुण व इ.१२ वीचे वर्षभरातील अंतर्गत मूल्यमापनातील सराव चाचण्या, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम अंतर्गत मूल्यमापनातील विषयनिहाय गुण तसेच इ.१२ वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत व तत्सम मूल्यमापन इत्यादींच्या आधारे विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुणदान करण्यात यावे. सदर गुणदान करताना शासन निर्णयातील सर्व तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

  इयत्ता १० वी, व इ.१२ वी मधील प्राप्त गुणांचे इ.१२ वीसाठी भारांशानुसार निर्धारित गुणांमध्ये रूपांतर करतांना अपूर्णांकात आलेले गुण पुढील पूर्ण गुणात रुपांतरीत करावेत. (उदा.१३.००=१३, १३.०१=१४, १३.५०=१४, १३.५१=१४)

**क) (१) विद्यार्थ्यास इ.१० वीमध्ये मंडळाच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळालेल्या तीन विषयांचे सरासरी गुण निश्चित करण्याची कार्यपध्दती**

- इयत्ता १० वी ला प्रविष्ठ होवून एकाच परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अंतिम निकालातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीला एकापेक्षा अधिक परीक्षेत प्रविष्ठ होवून टप्प्याटप्प्याने सूट मिळवून उत्तीर्ण झालेल्या व इ.१२ वीला पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत, विद्यार्थ्याने दिलेल्या इयत्ता १० वीच्या सर्व परीक्षांचा निकाल विचारात घेवून त्यातील सर्वोत्तम गुण असलेल्या तीन विषयांच्या सरासरी प्राप्त गुणांचे १०० पैकी गुणांत रुपांतर करण्यात यावे.
- इ.१० वीमध्ये श्रेणी सुधार योजनेअंतर्गत श्रेणी वाढ स्विकारलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत श्रेणी वाढ झालेली संपादणूक विचारात घेवून कार्यवाही करावी.

  राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळातून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत ५,६,७ किंवा त्यापेक्षा अधिक विषय असल्यास सर्वोत्तम गुणांचे ३ विषय विचारात घेवून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.
- सदर गुणांचे निश्चितीकरण करण्याची प्रक्रीया सुलभ व्हावी यासाठी मंडळामार्फत परिशिष्ट जे आर १.०१ व जे आर १.०२ मधील नमुन्यातील Excel sheet तक्ता उपलब्ध करून दिला जाईल. इयत्ता १२ वीला सन २०२१ च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची इ.१० वीच्या सर्व विषयांची संपादणूक त्यामध्ये भरल्यानंतर सदर विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांची बेरीज व पूर्णांकातील सरासरी (१०० पैकी) उपलब्ध होईल. सदर सरासरी इ.१० वीच्या ५० टक्के भारांशानुसार गुण निश्चितीसाठी वापरता येईल.

**क) (२) इ.१२ वी मधील सराव चाचण्या, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम अंतर्गत मूल्यमापनातील विषयनिहाय गुण**

- उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने विषयनिहाय मंजूर आराखडयानुसार ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम मूल्यमापन यापैकी एक किंवा अधिक बाबींच्या आधारे मूल्यमापन करून विद्यार्थ्यास गुणदान करावे.

- सदर विषयनिहाय प्राप्त गुण किती व ते किती पैकी आहेत याचा विचार करुन त्या विषयाच्या इयत्ता १२ वीसाठी भारांशानुसार निश्चित केलेल्या गुणांमध्ये रुपांतर करुन ते पूर्णांकात विचारात घ्यावेत. यासाठी परिपत्रकातील पृ.क्र.१२ वरील उदाहरणे पहावीत.

**क)(३) मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१२ वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत/तत्सम मूल्यमापन यामध्ये प्राप्त झालेले गुण**

- शासन निर्णयानुसार मंडळाच्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून प्रचलित पध्दतीने/अन्य पर्यायी पध्दतीचा वापर करून ऑनलाईन/अन्य शक्य पर्यायी पध्दतीने केलेल्या मूल्यमापनानुसार विद्यार्थ्यास विषयनिहाय प्रत्यक्ष प्राप्त झालेले गुण विचारात घ्यावेत.

**क)(४) श्रेणी विषयांचे मूल्यमापन**

- श्रेणी विषयांसाठी विहित पध्दतीने व यावर्षी मंडळाने दिलेल्या विशेष मार्गदर्शक सूचना विचारात घेवून विद्यार्थ्यांना गुणदान करून प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करावे.

**क) (५) विषयनिहाय Excel sheet स्वरूपातील परिशिष्ट**

(I) क)(१) प्रमाणे निश्चित केलेले इ.१० वीच्या सर्वोत्तम तीन विषयांचे १०० पैकी सरासरी गुण,

(II) क)(२) प्रमाणे विचारात घेतलेले सराव चाचण्या, स्वाध्याय, गृहकार्य, प्रकल्प, तत्सम मूल्यमापन यापैकी एक किंवा अधिक बाबींच्या मूल्यमापनाच्या आधारे प्राप्त गुण.

(III) क)(३) प्रमाणे मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थ्यास इ.१२ वीच्या अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत/तत्सम मूल्यमापन यामध्ये प्राप्त झालेले गुण.

(IV) क)(४) प्रमाणे श्रेणी विषयांचे मूल्यमापन

इत्यादी बाबींच्या नोंदी करण्यासाठी मंडळामार्फत विद्यार्थीनिहाय/विषयनिहाय परिशिष्टे (गुण विभागणी विचारात घेवून) Excel sheet स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये उपरोक्त चार प्रकारातील माहितीची/गुणांची नोंद करण्यात यावी. यासाठी परिशिष्ट- जे ३.०१ ते जे ३.०७ चा वापर करण्यात यावा.

- विषय शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या विषयनिहाय गुणांचे/श्रेणींचे विद्यार्थीनिहाय संकलन शाखांप्रमाणे स्वतंत्रपणे वर्ग शिक्षकांमार्फत दोन प्रतीत करण्यात यावे. त्यासाठी विहित नमुन्यातील **परिशिष्ट - जे आर १.०३ ते जे आर १.०८** (विषय योजनेनुसार लागू होणारे परिशिष्ट) वापरावे. सदर संकलित निकाल वर्गशिक्षकांनी स्वाक्षरीत करुन मुख्याध्यापक/प्राचार्यांकडे जमा करावा.

- **उपरोक्त सर्व बाबी व सूचना विचारात घेवून विद्यार्थ्यांचे विषयनिहाय निश्चित केलेले गुण/श्रेणी मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संगणक प्रणालीमध्ये इंग्रजी अंक/अक्षरांमध्ये भरण्यात यावेत.**

## ड) तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी

- संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा सन २०२१ साठी तुरळक विषय घेऊन प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी सदर शासन निर्णयातील तक्ता क्र.८ प्रमाणे गुणविभागणी विचारात घ्यावी.

तक्ता-८

| अ.क्र. | मूल्यमापनाचा तपशिल | भारांश |
|---|---|---|
| १. | राज्य मंडळाच्या व अन्य मंडळाच्या यापूर्वीच्या इ.१२वीच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांची सरासरी | विषयनिहाय निर्धारित मूल्यमापनाप्रमाणे |
| २. | विद्यार्थ्याचे इ.१२ वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत मूल्यमापन | विषयनिहाय निर्धारित मूल्यमापनाप्रमाणे |

- राज्य मंडळ व अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत मूल्यमापन करताना यापूर्वीच्या मंडळाच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा विषयनिहाय तपशील व प्राप्त झालेले गुण/श्रेणींची नोंद **परिशिष्ट -जे ४.०१** मध्ये करण्यात यावी.
- राज्य मंडळ व अन्य मंडळाच्या यापूर्वीच्या इ.१२ वीच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विषयांच्या लेखी परीक्षेतील प्राप्त गुणांच्या सरासरी एवढे (१०० पैकी) गुण प्रविष्ट झालेल्या विषयाच्या लेखी परीक्षेसाठी विषयनिहाय निर्धारित केलेल्या (१६०/१००/८०/७०/५०) गुणांत रुपांतर मंडळाच्या संगणक प्रणाली मार्फत करण्यात येऊन सदरचे गुण प्रविष्ट तुरळक विषयांच्या लेखी परीक्षेसाठी देण्यात येतील.
- सन २०२०-२१ मध्ये ज्या तुरळक विषयांसाठी विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाला असेल त्या विद्यार्थ्याचे इ.१२ वीचे अंतिम तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत व तत्सम मूल्यमापन यामध्ये विषयनिहाय प्राप्त झालेले (२०/३०/४०/५०/१००/१२० पैकी) गुण देण्यात येतील.
- उपरोक्तप्रमाणे विद्यार्थीनिहाय संकलन संबंधित विषय शिक्षकांनी दोन प्रतीत तयार करुन स्वाक्षरीसह मुख्याध्यापक/प्राचार्यांकडे जमा करावे.

## इ.श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ट विद्यार्थी-

- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२१ साठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे तसेच मंडळाच्या प्रचलित तरतूदीनुसार श्रेणीसुधार योजनेतंर्गत पुढील परीक्षेमध्ये संधी असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे या परीक्षेचे निकाल तयार करण्यात येणार नाहीत.

**उपरोक्त अ, ब, क, व ड बाबत संगणक प्रणालीमध्ये माहिती भरताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात.**

**१. विद्यार्थ्याने मंडळाकडे परीक्षेचे आवेदनपत्र सादर करताना नमूद केलेले विषय, यापूर्वीच्या परीक्षेत विषयात मिळालेली सूट याबाबत नमूद केलेला तपशील संगणकीय प्रणालीमध्ये दिसेल.**

**२. सदर तपशीलातील विषयात अथवा विषयातील सूट यामध्ये बदल असल्यास गुणांच्या सर्व रकान्यामध्ये MM असे दर्शवावे.**

३. एखादया विषयाच्या काही भागांसाठी विद्यार्थी उपस्थित नसल्यास व प्रयत्न करुनही त्याचे मूल्यमापन करणे शक्य होत नसल्यास अशा रकान्यात AA अशी नोंद करावी.

४. एखादा विद्यार्थ्याची इ.१० वी व इ.११ वीची संपादणूक उपलब्ध आहे, तथापि तो इ.१२ वीच्या एक किंवा अधिक विषयाच्या वर्षभरातील लेखी अंतर्गत मूल्यमापन तसेच तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत व तत्सम मूल्यमापन यापैकी एक किंवा दोन्ही भागाच्या मूल्यमापनात सहभागी झाला नसल्यास सदर विद्यार्थ्याची त्या विषयाची इ.१० वी व इ.११ वी ची संपादणूक नोंदवावी, इ.१२ वीच्या परीक्षेतील जे गुण उपलब्ध नाहीत तो रकाना रिक्त ठेवण्यात यावा. संबंधित पृष्ठाची प्रिंट घेतल्यानंतर संकलित निकालात रिक्त जागी लाल शाईने AA असे नोंदवावे. सदर विद्यार्थ्याबाबत उर्वरित रकाने गणन करुन भरण्यात यावेत.

५. उपरोक्तप्रमाणे बदलेल्या विषयाचे गुण व इतर तपशील संबंधित विषयाच्या व संकलित निकालाच्या परिशिष्टांमध्ये दर्शवावेत.

उपरोक्त अ ते ड प्रमाणे माहिती विहित प्रपत्रामध्ये विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतर व मंडळाच्या संगणकीय प्रणालीमध्ये भरल्यानंतर त्यामध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर कोणताही बदल करता येणार नाही. त्यामुळे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विविध परिशिष्टामध्ये तसेच संगणकीय प्रणालीमध्ये माहिती भरतांना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

### ५. अभिलेख जतन करणे व अभिलेखांची पडताळणी–

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे इ.११ वीच्या वार्षिक मूल्यमापनाचे अभिलेख व इ.१२ वीच्या अंतर्गत मूल्यमापनाचे संदर्भातील सर्व अभिलेख, संबंधित उत्तरपत्रिका व तत्सम बाबी निकाल समितीच्या पडताळणीनंतर सिलबंद स्वरुपात जतन करण्यात याव्यात. व ते तपासणी/पडताळणीसाठी विभागीय मंडळ, शालेय शिक्षण विभागातील क्षेत्रीय अधिकारी/तपासणी पथके यांना मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात यावेत.

### ६. कार्यपध्दतीचे उल्लंघन करणाऱ्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांबाबत कारवाई–

सदर शासन निर्णय व मंडळाने या परिपत्रकाद्वारे तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाद्वारे दिलेली कार्यपध्दती व सूचनांचे उल्लंघन, कसूर करणाऱ्या, अभिलेखांमध्ये गैरप्रकार करणाऱ्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय/व्यक्ती/समितीचे घटक शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यवाही/कारवाईस पात्र असतील.

### ७. गुणपडताळणी/उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती मिळणे/पुनर्मूल्यांकन–

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती मिळणे, पुनर्मूल्यांकन या सुविधा सदर परीक्षेसाठी कोणत्याही स्तरावर उपलब्ध नसतील.

उपरोक्तप्रमाणे नियमित, पुनर्परीक्षार्थी, खाजगी व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणारे विद्यार्थी इत्यादींसाठी आवश्यक असणारी व यापूर्वी संबंधित ठिकाणी नमूद केलेली Excel sheet स्वरूपातील परिशिष्टे मंडळाच्या **mahahsscboard.in** या संकेतस्थळावर **HSC Marks Portal** या टॅब वर क्लिक केल्यानंतर उपलब्ध होतील. सुरुवातीला सदर परिशिष्टांची यादी दिसेल. त्यापैकी आवश्यक असलेल्या परिशिष्टांसमोर क्लिक केल्यानंतर डाऊनलोड करुन घेता येतील.

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्याशी संबंधित Excel sheet स्वरूपातील परिशिष्टे भरल्यानंतर त्याची दोन प्रतीत प्रिंट काढावी व ती संबंधित वर्ग शिक्षक/ विषय शिक्षकांनी स्वाक्षरीत करुन शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे निकाल समितीकडे परीक्षण/नियमनासाठी सादर करावीत.

निकाल समितीने अंतिम केलेली प्रत्येकी एक प्रत विभागीय मंडळाने निश्चित केलेल्या कालावधीत सिलबंद पाकिटात संबंधित विभागीय मंडळास सादर करावी. सिलबंद पाकिटामध्ये सादर करावयाच्या बाबींचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | परिशिष्टे/अन्य बाबी | पृष्ठ क्रमांक | | एकूण पृष्ठे |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| ०१ | नियमित विद्यार्थी (विषयनिहाय परिशिष्टे) | जे-१.०१ ते जे-१.१३ (लागू असलेली ) | | | |
| ०२ | पुनर्परीक्षार्थी (विद्यार्थीनिहाय परिशिष्टे) | जे-२.०१ ते जे-२.०८ (लागू असलेली ) | | | |
| ०३ | खाजगी विद्यार्थी (विषयनिहाय परिशिष्टे) | जे-३.०१ ते जे-३.०७ (लागू असलेली ) | | | |
| ०४ | तुरळक विषय घेऊन प्रविष्ट झालेले विद्यार्थी (विद्यार्थीनिहाय परिशिष्ट) | जे-४.०१ | | | |
| ०५ | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा विद्यार्थीनिहाय सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांची सरासरी (राज्यमंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी) | जे आर-१.०१ | | | |
| ०६ | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा - विद्यार्थीनिहाय सर्वोत्तम तीन विषयांच्या गुणांची सरासरी (अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी) | जे आर-१.०२ | | | |
| ०७ | संकलित निकाल तक्ते (नियमित व खाजगी विद्यार्थी-कला, वाणिज्य, विज्ञान, द्विलक्षी अभ्यासक्रम, एमसीव्हीसी, एनएसक्यूएफ ) | जे आर १.०३ ते जे आर १.०८ (लागू असलेली) | | | |
| ०८ | अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या इ.१० वीच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत | गुणपत्रिका संख्या ---------- | | | |
| ०९ | इ.११ वीच्या अंतिम संकलित निकालाची साक्षांकित प्रत | | | | |
| १० | इ.११ वी अन्य मंडळातून/अन्य कनिष्ठ महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ.११ वीच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत | गुणपत्रिका संख्या --------- | | | |
| ११ | तुरळक विषयास प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यापूर्वीच्या इ.१२ वीच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत | गुणपत्रिका संख्या --------- | | | |

टिप- उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.०८ ते ११ याबाबत संकलित निकाल प्रतीवर/गुणपत्रिकेवर उजव्या बाजुला प्रत्येक विद्यार्थ्याचा सन २०२१ मधील इ.१२ वी परीक्षेचा बैठक क्रमांक नमूद करावा.

निकाल समितीने निकालाचे परीक्षण व नियमन करुन निकाल अंतिम केल्यानंतर उपरोक्त परिशिष्टातील माहिती भरुन स्वाक्षरीत व प्रमाणित केलेली मूळ परिशिष्टे (विषयनिहाय निकाल, संकलित निकाल, विद्यार्थीनिहाय तपशील इ.) अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांची इ.१० वीच्या गुणपत्रिकेची प्रमाणित छायाप्रत व इ.११ वीच्या निकालपत्रकाची/गुणपत्रकांची प्रमाणित छायाप्रत सिलबंद स्वरुपात संबंधित विभागीय मंडळाकडे जमा करावीत.

शासन निर्णयानुसार निश्चित केलेली कार्यपध्दती विचारात घेऊन उपरोक्त प्रक्रियेदवारे मंडळाच्या संगणकीय प्रणालीदवारे प्राप्त होणारे गुण, विविध परिशिष्टांमध्ये विभागीय मंडळाकडे सिलबंद स्वरुपात प्राप्त होणारा गुणांचा तपशील व इ.१० वी व इ.११ वी (लागू असल्याप्रमाणे) विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या विषयनिहाय गुणांची निश्चिती करण्यात येईल. शासनाच्या व मंडळाच्या धोरणानुसार तसेच तरतूदीनुसार देय असलेल्या अन्य गुणांचा लाभ प्रचलित पध्दतीनुसार देण्यात येईल. तद्नंतर मंडळाचे उत्तीर्णबाबतचे सर्व निकष विचारात घेऊन निकाल जाहीर करुन विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्यात येईल.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ०४.